भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०

(१९३० चा अधिनियम क्रमांक २)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Dangerous Drugs Act, 1930

(Act No. 2 of 1930)

**[ As in force on the 1st October, 1978 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत
सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

१९७९

[किंमत—६० पैसे]

# घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. द्रवरूप सिद्धपदार्थांमधील टक्केवारी परिगणना करून ठरवणे.

### प्रकरण २ रे

### मनाई व नियंत्रण

४. विवक्षित क्रियाव्यापारांना मनाई.

५. अफूचे उत्पादन आणि पुरवठा यांवर केंद्र शासनाचे नियंत्रण.

६. बनीव औषधिद्रव्यांच्या निर्मितीवर केंद्र शासनाचे नियंत्रण.

७. खुश्कीच्या आणि सागरी सरहद्दींवरील क्रियाव्यापारांचे नियंत्रण.

८. बनीव औषधिद्रव्ये आणि कोका पत्ती यांच्या देशांतर्गत क्रयविक्रयावर राज्य शासनाचे नियंत्रण.

९. घातक औषधिद्रव्यांसंबंधीच्या देशाबाहेरील व्यवहारांवर राज्य शासनाचे नियंत्रण.

### प्रकरण ३ रे

### गुन्हे व दंड

१०. कलम ४ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

११. कलम ५ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१२. कलम ६ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१३. कलम ७ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१४. कलम ८ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१५. गुन्हा करण्यासाठी वास्तूचा उपयोग करू देण्याबद्दल शिक्षा.

१६. विवक्षित गुन्ह्यांबद्दल आधी झालेल्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.

१७. कलम १५ खालील गुन्ह्याबद्दल आधी झालेल्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.

१८. विवक्षित गुन्हे करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी जामीन.

१९. कलम ९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

२०. प्रयत्न.

२१. अपप्रेरण.

### प्रकरण ४ थे

### प्रक्रिया

२२. वॉरंटे काढण्याची शक्ती.

२३. वॉरंटाशिवाय प्रवेश करणे, झडती घेणे, सक्तीने ताब्यात घेणे आणि अटक करणे यांबाबतची शक्ती.

२४. सार्वजनिक ठिकाणी सक्तीने ताब्यात घेण्याची किंवा अटक करण्याची शक्ती.

२५. झडत्या घेण्याची आणि अटका करण्याची पद्धत.

२६. एकमेकांना सहाय्य करण्याचे कर्मचाऱ्यांवरील आबंधन.

२७. अटकांचा व अभिग्रहणांचा अहवाल.

२८. त्रास देण्यासाठी केलेला प्रवेश, झडती, अभिग्रहण किंवा अटक याबद्दल शिक्षा.

२९. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची आणि सक्तीने ताब्यात घेतलेल्या वस्तूंची व्यवस्था.

३०. पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या शक्ती उत्पादनशुल्क अधिकाऱ्याकडे विनिहित करण्याची शक्ती.

३१. [निरसित.]

३२. विधिनिषिद्ध वस्तू कब्जात बाळगण्यावरून निघणारे गृहीतक.

३३. विधिनिषिद्ध वस्तू सरकारजमा होण्यास पात्र असणे.

३४. सरकारजमा करण्यासंबंधीची कार्यपद्धती.

३५. सरकारजमा झालेल्या वस्तूंच्या विल्हेवाटीचे आणि बक्षिसांचे नियमन करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण ५ वे

### संकीर्ण

३६. नियमांसंबंधीचे उपबंध.

३७. शासनाला येणे असलेल्या रकमांची वसुली.

३८. 'सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८' लागू करणे.

३९. स्थानिक आणि विशेष कायद्यांची व्यावृत्ती.

४०. [निरसित.]

४१. आधीच केलेल्या गोष्टींची व्यावृत्ती.

अनुसूची १ ली.

अनुसूची २ री. [निरसित.]

# घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०

## (१९३० चा अधिनियम क्रमांक २)[1]

[१ मार्च, १९३०]

**घातक औषधिद्रव्यांशी संबंधित क्रियाव्यापारांवरील नियंत्रणाधिकाराचे केंद्रीकरण करून तो केंद्र शासनाच्या ठायी निहित करण्यासाठी आणि अशा क्रियाव्यापारांसंबंधीच्या गुन्ह्यांबद्दलचे दंड वाढवून ते [2]* * * एकरूप करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, लीग ऑफ नेशन्सने २७ सप्टेंबर, १९२३ रोजी केलेल्या ठरावानुसार निमंत्रित करण्यात आलेल्या व १७ नोव्हेंबर, १९२४ रोजी जिनिव्हा येथे भरलेल्या द्वितीय आंतरराष्ट्रीय अफू परिषदेमध्ये भारताने भाग घेतला होता आणि १९ फेब्रुवारी, १९२५ रोजी घातक औषधिद्रव्यांसंबंधीच्या अभिसंधीचा (यात यापुढे 'जिनिव्हा अभिसंधि' म्हणून निर्दिष्ट) अंगीकार केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त जिनिव्हा अभिसंधीवर स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी भारत हे एक राज्य होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त जिनिव्हा अभिसंधीमधील संविदाकार पक्षांनी घातक औषधिद्रव्यांच्या—विशेषतः अफू, भांग आणि कोका पत्ती यांच्या—निषिद्ध व्यापारधंद्याला किंवा त्यांच्या दुरुपयोगाला आळा घालण्यासाठी आणखी उपाय योजण्याचा निर्धार केलेला असून असे उपाय उक्त जिनिव्हा अभिसंधीच्या कलमबंदीमध्ये अधिक तपशीलवार नमूद केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त उपाय परिणामकारकपणे अंमलात आणण्यासाठी घातक औषधिद्रव्यांसंबंधीच्या विवक्षित क्रियाव्यापारांवरील नियंत्रणाधिकाराचे केंद्रीकरण करून तो केंद्र शासनाच्या ठायी निहित करणे समयोचित आहे ;

आणि ज्याअर्थी, घातक औषधिद्रव्यांसंबंधीच्या विवक्षित गुन्ह्यांबद्दलचे दंड वाढवणे आणि विवक्षित क्रियाव्यापारांसंबंधीचे सर्व दंड [2]* * * * एकरूप करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

[3][(२) त्याचा विस्तार [4]* * * संपूर्ण भारतभर आहे. ]

(३) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [5]दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "कोका पत्ती" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे—

(एक) कोणत्याही कोका वनस्पतीची म्हणजे एरिथ्रोक्सिलॉन कोका (एलएएम्के.) आणि एरिथ्रोक्सिलॉन नोव्होग्रॅनाटीन्ज (एच्आयइआर्एन्.) यांची आणि केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ कोका वनस्पती म्हणून घोषित करील अशी या जातींपैकी अन्य कोणत्याही पोटजातीची पत्ती व कोवळ्या डहाळ्या ; आणि

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९२९, भाग पाच, पृष्ठ १३८; प्रवर समितीच्या अहवालासाठी पहा, कित्ता, १९३०, भाग पाच, पृष्ठ २७.

हा अधिनियम तामिळनाडूमध्ये १९४७ चा ३४ व १९५० चा १६ या मद्रास अधिनियमांद्वारे विशोधित करण्यात आला. बिहारमध्ये १९३८ चा बिहार अधिनियम ६ द्वारे; तामिळनाडूमध्ये १९३७ चा १० व १९४३ चा २२ या मद्रास अधिनियमांद्वारे; ओरिसामध्ये १९३९ चा ओरिसा अधिनियम ७ द्वारे अंशतः निरसित करण्यात आला.

'वऱ्हाड विधी अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) द्वारे वऱ्हाडवर; १९६२ चा विनियम १२-कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर; १९६३ चा विनियम ६-कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगरहवेली यांवर; १९६३ चा विनियम ७-कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे पाँडिचेरीवर आणि १९६५ चा विनिमय ८-कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदीवी या बेटांवर विस्तारित करण्यात आला.

२. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे "भारताच्या प्रांतांमध्ये सर्वत्र" हे शब्द गाळले.

३. कित्ता—द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी घातले.

४. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून" हे शब्द गाळले.

५. १ फेब्रुवारी, १९३१-पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९३१, भाग एक, पृष्ठ ३५.

(दोन) उदासीन द्रव्यांसहित किंवा त्यांविरहित असे त्याचे कोणतेही मिश्रण;
पण यात ०.१ टक्क्याहून अधिक नाही इतपत कोकेन अंतर्भूत असलेला कोणताही सिद्धपदार्थ समाविष्ट नाही ;

(ख) "कोकाजन्य द्रव्य" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) अशोधित कोकेन, म्हणजे कोकेन बनवण्यासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जो वापरता येतो असा कोका पत्तीचा कोणताही अर्क ;

(दोन) एक्गोनाइन म्हणजे $C_9H_{15}NO_3H_2O$ हे रासायनिक सूत्र असलेले लेव्हो-एक्गोनाइन आणि ज्यांपासून ते परत मिळवता येते अशी सर्व लेव्हो-एक्गोनाईनजन्य द्रव्ये ;

(तीन) कोकेन, म्हणजे $C_{17}H_{21}NO_4$ हे रासायनिक सूत्र असलेले मेथिल-बेंझाइल लीव्हो-एक्गोनाइन व त्याचे क्षार ; आणि

(चार) ज्यात ०.१ टक्क्याहून जास्त कोकेनचा अंतर्भाव आहे असे सर्व शास्त्रीय आणि शास्त्रीयेतर सिद्धपदार्थ ;

(ग) "हेंप" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) इंडियन हेंप ( Cannabis Sativa L. ) या वनस्पतीची पत्ती, छोटी डेंखे आणि फुलारणारे किंवा फळणारे शेंडे—भांग, सिद्धी किंवा गांजा म्हणून ओळखले जाणारे सर्व प्रकार धरून ;

(दोन) चरस, म्हणजे आवेष्टन व वाहतूक यांसाठी आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही ज्यावर कोणतीही क्रिया केलेली नाही अशी, इंडियन हेंप या वनस्पतीपासून मिळालेली राळसाळ ; आणि

(तीन) वरीलपैकी कोणत्याही प्रकारच्या हेंपपासून उदासीन द्रव्यांसहित किंवा त्यांविरहित तयार केलेले कोणतेही मिश्रण किंवा त्यापासून तयार केलेले कोणतेही पेय ;

(घ) "औषधोपयोगी हेंप" याचा अर्थ, कसलाही हेंपचा अर्क किंवा मद्यार्कयुक्त अर्क असा आहे ;

(ङ) "अफू" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

[1][(एक) खसखशीची बोंडे ( Papaver Somniferum L. )—मग ती मूळ स्वरूपातील असोत किंवा फुटलेली, चेचलेली किंवा पूड केलेली असोत आणि त्यातून रस काढण्यात आलेला असो वा नसो];

(दोन) अशा बोंडांतील नैसर्गिकपणे साकळलेल्या ज्या रसावर आवेष्टन व वाहतूक यांसाठी आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही कसलीही क्रिया करण्यात आलेली नाही असा रस ;

(तीन) वरीलपैकी कोणत्याही प्रकारच्या अफूपासून उदासीन द्रव्यांसहित किंवा त्यांविरहित तयार केलेले कोणतेही मिश्रण :

परंतु, यात ०.२ टक्क्यांहून जास्त अफूचा अर्क असलेला कोणताही सिद्धपदार्थ समाविष्ट नाही ;

(च) "अफूजन्य द्रव्य" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) औषधोपयोगी अफू, म्हणजे ज्या अफूवर ब्रिटिश औषधिगुणधर्मग्रंथानुसार औषधी उपयोगास अनुकूल होण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया करण्यात आल्या आहेत ती अफू—मग ती अफू पूड केलेली किंवा कणीदार किंवा इतर कोणत्याही स्वरूपात असो वा त्यात उदासीन द्रव्ये मिसळलेली असोत ;

(दोन) क्रियासिद्ध अफू, म्हणजे धूम्रपानासाठी योग्य अशा अर्कामध्ये रूपांतर करण्याच्या उद्देशाने अफूवर करण्यात आलेल्या प्रक्रियाक्रमानंतर मिळणारा कोणताही पदार्थ, आणि अफूचे धूम्रपान केल्यानंतर उरणारा गाळ किंवा शिल्लक राहणारा कोणताही भाग ;

(तीन) मॉर्फिन, म्हणजे ज्याचे रासायनिक सूत्र $C_{17}H_{19}NO_3$ असे आहे असा अफूचा मुख्य अल्कलॉइड व त्याचे क्षार ;

(चार) डायासिटिलमॉर्फिन, म्हणजे ज्याचे रासायनिक सूत्र $C_{21}H_{23}NO_5$ असे आहे असा डायामॉर्फिन किंवा हेरॉइन म्हणून ओळखला जाणारा अल्कलॉइड व त्याचे क्षार ;

(पाच) ज्यांमध्ये ०.२ टक्क्यांहून अधिक प्रमाणात मॉर्फिन अंतर्भूत आहे किंवा ज्यांत कोणतेही डायासिटिलमॉर्फिन आहे असे सर्व शास्त्रीय व शास्त्रीयेतर सिद्धपदार्थ ;

(छ) "बनीव औषधिद्रव्य" या संज्ञेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) सर्व कोकाजन्य द्रव्ये, औषधोपयोगी भांग आणि अफूजन्य द्रव्ये, आणि

---

१. १९५७ चा अधिनियम ५२-कलम ५ द्वारे मूळ उपखंड (एक) ऐवजी घातले.

(दोन) जिनिव्हा अभिसंधीच्या १० व्या कलमाखाली केलेल्या शिफारशीला अनुसरून [१][अथवा जिनिव्हा अभिसंधीला पूरक अशा कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीला अनुसरून] **शासकीय राजपत्रातून** काढलेल्या अधिसूचनेद्वारे केंद्र शासन बनीव औषधिद्रव्य म्हणून घोषित करील असा अन्य कोणताही गुंगीकारक पदार्थ ;

पण जिनिव्हा अभिसंधीच्या ८ व्या कलमाखालील निष्कर्षाला अनुसरून [१][अथवा जिनिव्हा अभिसंधीला पूरक अशा कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीला अनुसरून] **शासकीय राजपत्रातून** काढलेल्या अधिसूचनेद्वारे केंद्र शासन जो सिद्धपदार्थ बनीव औषधिद्रव्य नाही असे घोषित करील अशा कोणत्याही सिद्धपदार्थाचा त्यामध्ये समावेश नाही ;

(ज्) "घातक औषधिद्रव्य" या संज्ञेमध्ये कोकापत्ती, भांग व अफू, आणि सर्व बनीव औषधिद्रव्ये समाविष्ट आहेत :

[३][(झ्) "[५][भारतात] आयात करणे" याचा अर्थ, केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सीमाशुल्क सरहद्दींपैकी कोणतीही सरहद्द पार करून खुश्कीच्या मार्गाने, समुद्रमार्गाने किंवा हवाईमार्गाने [५][भारतात] आणणे असा आहे [७][,आणि ज्या जहाजातून किंवा यानातून एखाद्या औषधिद्रव्याची वाहतूक करण्यात येत आहे त्यातून ते न हलवता [५][भारताच्या] बाहेर नेण्याच्या उद्देशाने ते [५][भारतातील] कोणत्याही बंदरात किंवा ठिकाणी आणणे हे त्यामध्ये समाविष्ट आहे] ;

(ञ्) "आंतरप्रांतीय आयात करणे" याचा अर्थ, उक्त सीमाशुल्क सरहद्दींपैकी कोणतीही सरहद्द पार करून नव्हे तर अन्य प्रकारे एखाद्या राज्यात आणणे असा आहे ;

(ट्) "[५][भारतातून] निर्यात करणे" याचा अर्थ, उक्त सीमाशुल्क सरहद्दींपैकी कोणतीही सरहद्द पार करून खुश्कीच्या मार्गाने, समुद्रमार्गाने किंवा हवाईमार्गाने [५][भारताच्या] बाहेर नेणे असा आहे ;

(ठ्) "आंतरप्रांतीय निर्यात करणे" याचा अर्थ, उक्त सीमाशुल्क सरहद्दींपैकी कोणतीही सरहद्द पार करून नव्हे तर अन्य प्रकारे एखाद्या राज्यातून बाहेर नेणे असा आहे ;

[६]* * * * * ; आणि]

(ड्) "परिवहन करणे" याचा अर्थ त्याच राज्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणे असा आहे; [४]* * *

[४]* * * * * .

**३.** कलम २ चे खंड (क्), (ख्), (ङ्) व (च्) यांच्या प्रयोजनार्थ, द्रवरूप सिद्धपदार्थांच्या बाबतीत टक्केवारी कोणत्या पद्धतीने परिगणना करून ठरवावयाची ते विहित करणारे नियम केंद्र शासनाला करता येतील : **द्रवरूप सिद्धपदार्थांमधील टक्केवारी परिगणना करून ठरवणे.**

परंतु, असे नियम करण्यात आले नाहीत तर व तोपर्यंत, सिद्धपदार्थामध्ये एखादे द्रव्य एक टक्का आहे याचा अर्थ, असे द्रव्य घनरूप असेल तर त्याचा एक ग्रॅम किंवा ते द्रव्य द्रवरूप असेल तर त्याचा एक मिलिलिटर इतके ते द्रव्य दर शंभर मिलिलिटर सिद्धपदार्थात अंतर्भूत आहे असे धरून त्या आधारे टक्केवारी आणि अशा प्रमाणानुसार पुढील कमीअधिक टक्केवारी ठरवली जाईल.

## प्रकरण २ रे

### मनाई व नियंत्रण

४. [२][(१)] कोणाही व्यक्तीला— **विवक्षित क्रिया-व्यापारांना मनाई.**

(क्) कोका वनस्पतीची लागवड करता येणार नाही किंवा कोका वनस्पतीचा कोणताही भाग वेचता येणार नाही,

(ख्) क्रियासिद्ध अफूची निर्मिती करता येणार नाही किंवा जिच्याजवळ अफू आहे त्या व्यक्तीने आपल्या उपभोगासाठी कायदेशीरपणे कब्जात बाळगलेल्या त्या अफूपासून ती तयार केलेली नसेल तर, तो कब्जात बाळगता येणार नाही, किंवा

---

१. १९३३ चा अधिनियम २६-कलम २ द्वारे घातले.
२. कित्ता—कलम ३ द्वारे कलम (४) ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.
३. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे खंड (झ्) ते (ठ्) यांऐवजी खंड (झ्) ते (ठ्ठ्) घातले.
४. कित्ता—द्वारे "आणि" हा शब्द व खंड (ढ्) गाळले.
५. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी भारताचा उल्लेख घातला.
६. कित्ता—कलम २ व अनुसूची यांद्वारे खंड (ठ्ठ्) गाळला.
७. १९३८ चा अधिनियम ३-कलम २ द्वारे जादा दाखल केले.

(ग्) क्रियासिद्ध अफू [1][भारतात] आयात करता येणार नाही, [1][भारतातून] निर्यात करता येणार नाही अथवा तिचे वाहनांतरण किंवा विक्री करता येणार नाही :

परंतु, हे कलम शासनाच्या वतीने कोणत्याही कोका पत्तीची लागवड किंवा त्याच्या एखाद्या भागाची वेचणी होत असल्यास त्या बाबतीत लागू होणार नाही.

[2][(२) पोटकलम (१) च्या खंड (ख्) खाली कायदेशीरपणे कब्जात बाळगण्यात आलेल्या अफूपासून क्रियासिद्ध अफूची निर्मिती करणे आणि ती कब्जात बाळगणे याबाबत निर्बंध घालणारे किंवा विनियमन करणारे नियम राज्य शासनाला करता येतील.]

**अफूचे उत्पादन आणि पुरवठा यांवर केंद्र शासनाचे नियंत्रण.**

५. (१) पोटकलम (२) खाली करण्यात आलेले नियम आणि त्या प्रयोजनार्थ त्या नियमांखाली जे कोणतेही लायसन मिळवावे लागेल त्याच्या शर्ती यांना सोडून अन्यथा कोणाही व्यक्तीला,---

(क्) खसखशीची लागवड करता येणार नाही, किंवा

(ख्) अफूची निर्मिती करता येणार नाही.

(२) खसखशीची लागवड आणि अफूची निर्मिती यांबाबत परवानगी देणारे आणि त्यांचे विनियमन करणारे [3]नियम केंद्र शासनाला करता येतील आणि अशा लागवडीसाठी व निर्मितीसाठी द्यावयाच्या लायसनांचा नमुना आणि शर्ती, ज्यांनी अशी लायसने मंजूर करावयाची ती प्राधिकरणे, त्यांसाठी आकारता येईल ती फी, आणि अशी लागवड व निर्मिती यांवरील केंद्र शासनाचे नियंत्रण प्रभावी करण्यासाठी आवश्यक अशी अन्य कोणतीही बाब अशा नियमांद्वारे विहित करता येईल.

(३) सरकारी कारखान्यात तयार होणारी अफू निर्यातीसाठी किंवा राज्य शासनांना अगर तत्संबंधी निर्मिती करणाऱ्या औषधकारांना विकण्यासाठी परवानगी देणारे व त्याबाबत विनियमन करणारे [3]नियमदेखील केंद्र शासनाला करता येतील.

**बनीव औषधिद्रव्यांच्या निर्मितीवर केंद्र शासनाचे नियंत्रण.**

६. (१) पोटकलम (२) खाली करण्यात आलेले नियम आणि त्या नियमांखाली त्या प्रयोजनार्थ जे कोणतेही लायसन मिळवावे लागेल त्याच्या शर्ती यांना सोडून अन्यथा, कोणाही व्यक्तीला क्रियासिद्ध अफूव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बनीव औषधिद्रव्याची निर्मिती करता येणार नाही.

(२) क्रियासिद्ध अफू खेरीजकरून इतर बनीव औषधिद्रव्यांच्या निर्मितीला परवानगी देणारे आणि त्याबाबत विनियमन करणारे [4]नियम केंद्र शासनाला करता येतील, आणि इतर निर्मितीसाठी द्यावयाच्या लायसनांचा नमुना आणि शर्ती, ज्यांनी अशी लायसने मंजूर करावयाची ती प्राधिकरणे, त्यांसाठी आकारता येईल ती फी आणि अशा निर्मितीवरील केंद्र शासनाचे नियंत्रण प्रभावी करण्यासाठी आवश्यक अशी अन्य कोणतीही बाब अशा नियमांद्वारे विहित करता येईल.

(३) निर्मात्याला जी सामग्री कब्जात बाळगण्याचा हक्क आहे अशा कोणत्याही सामग्रीपासून औषधोपयोगी अफूची अथवा मॉर्फिन, डायासिटिलमॉर्फिन किंवा कोकेन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही सिद्ध पदार्थाची निर्मिती करण्यासंबंधात या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**खुश्कीच्या आणि सागरी सरहद्दींवरील क्रियाव्यापारांचे नियंत्रण.**

७. (१) पोटकलम (२) खाली करण्यात आलेले नियम आणि त्या प्रयोजनार्थ त्या नियमांखाली जे कोणतेही लायसन मिळवावे लागेल त्याच्या शर्ती यांना सोडून अन्यथा, कोणाही व्यक्तीला क्रियासिद्ध अफूव्यतिरिक्त अन्य कोणतेही घातक औषधिद्रव्य---

(क्) [1][भारतात ] आयात करता येणार नाही,

(ख्) [1][भारतातून] निर्यात करता येणार नाही, किंवा

(ग्) वाहनांतरित करता येणार नाही.

(२) क्रियासिद्ध अफूखेरीज इतर घातक औषधिद्रव्यांची [1][भारतात] आयात करण्यास, तेथून निर्यात करण्यास, आणि वाहनांतरण करण्यास परवानगी देणारे आणि त्याबाबत विनियमन करणारे [5]नियम, केंद्र शासनाला करता येतील, आणि कोणत्याही प्रकारचे घातक औषधिद्रव्य जेथे आयात, निर्यात किंवा वाहनांतरित करता येईल अशी बंदरे आणि ठिकाणे, अशी आयात, निर्यात किंवा वाहनांतरण यांसाठी द्यावयाच्या लायसनांचा नमुना आणि शर्ती, ज्यांनी अशी लायसने मंजूर करावयाची ती प्राधिकरणे, त्यांसाठी आकारता येईल ती फी आणि अशी आयात, निर्यात आणि वाहनांतरण यांवरील केंद्र शासनाचे नियंत्रण प्रभावी करण्यासाठी आवश्यक अशी कोणतीही बाब अशा नियमांद्वारे विहित करता येईल.

---

१. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे ' राज्ये ' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

२. १९३३ चा अधिनियम २६-कलम ३ द्वारे घातले.

३. पहा, केंद्रीय अफू नियम, १९३४, गॅझेट ऑफ इंडिया, १९३४, भाग एक, पृ. २२४.

४. पहा, केंद्रीय बनीव औषधिद्रव्य नियम, १९३४, कित्ता---भाग एक, पृ. २२८.

५. घातक औषधिद्रव्य (आयात, निर्यात व वाहनांतरण) नियम, १९३३ व केंद्रीय चरसविषयक (खुश्कीमार्गे आयात) नियम, १९३५ यांसाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९३३, भाग एक, पृष्ठ १११ व कित्ता--१९३५ भाग एक, पृष्ठ १०७४.

८. (१) पोटकलम (२) खाली करण्यात आलेले नियम आणि त्या नियमांखाली त्या प्रयोजनार्थ जे कोणतेही लायसन मिळवावे लागेल त्याच्या शर्ती यांना सोडून अन्यथा, कोणाही व्यक्तीला—— बनीव औषधिद्रव्ये आणि कोका पत्ती यांच्या देशांतर्गत क्रयविक्रयावर राज्य शासनाचे नियंत्रण.

(क) क्रियासिद्ध अफूखेरीज इतर कोणत्याही बनीव औषधिद्रव्याची किंवा कोका पत्तीची एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात आयात किंवा निर्यात करता येणार नाही, त्याचे परिवहन करता येणार नाही किंवा ते कब्जात बाळगता येणार नाही किंवा त्याची विक्री करता येणार नाही, किंवा

(ख) औषधोपयोगी अफू अगर ज्यात मॉर्फिन, डायासिटिलमॉर्फिन किंवा कोकेन अंतर्भूत आहे असा कोणताही सिद्धपदार्थ यांची निर्मिती करता येणार नाही.

(२) राज्य शासन [१] * * *——

(क) क्रियासिद्ध अफूखेरीज इतर बनीव औषधिद्रव्ये आणि कोका पत्ती यांची त्याच्या प्रशासनाखाली असलेल्या क्षेत्रांमध्ये आंतरप्रांतीय आयात आणि निर्यात करण्यास, परिवहन करण्यास, ती कब्जात बाळगण्यास आणि त्यांची विक्री करण्यास ; आणि

(ख) जी सामग्री कब्जात बाळगण्याचा निर्मात्याला कायदेशीर हक्क आहे अशा सामग्रीपासून औषधोपयोगी अफूची अथवा मॉर्फिन, डायासिटिलमॉर्फिन किंवा कोकेन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही सिद्धपदार्थांची निर्मिती करण्यास;

परवानगी देणारे आणि त्याबाबत विनियमन करणारे नियम करू शकेल.

अशा नियमांद्वारे अशी आयात, निर्यात, परिवहन, कब्जा, विक्री आणि निर्मिती यांसाठी द्यावयाच्या लायसनांचा नमुना आणि शर्ती, ज्यांनी अशी लायसने मंजूर करावयाची ती प्राधिकरणे, त्यांसाठी आकारता येईल ती फी, आणि अशी आयात, निर्यात, परिवहन, कब्जा, विक्री आणि निर्मिती यांवरील राज्य शासनाचे नियंत्रण प्रभावी करण्यासाठी आवश्यक असलेल्या अन्य कोणत्याही बाबी विहित करता येतील.

(३) पोटकलम (२) खाली करण्यात आलेल्या नियमांत व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढी मर्यादा सोडन एरव्ही, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट शासनाच्या मालकीच्या व त्याच्या कब्जात असतील त्या बनीव औषधिद्रव्यांना लागू होणार नाही:

परंतु, या कलमाखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांखाली जी व्यक्ती अशी औषधिद्रव्ये कब्जात बाळगण्यास हक्कदार नाही अशा कोणत्याही व्यक्तीला ती विकली जाणार नाही किंवा अन्यथा तिच्याकडे ती सुपूर्द केली जाणार नाहीत.

९. ज्या द्वारे एखादे घातक औषधिद्रव्य [२][भारताच्या] बाहेर मिळवले जाते, व [२][भारताच्या] बाहेरील कोणाही व्यक्तीस पुरवले जाते अशा कोणत्याही व्यापारात, राज्य शासनाने मंजूर केलेल्या लायसनाच्या शर्तींना सोडून अन्यथा व राज्य शासनाने स्वविवेकानुसार मुभा दिली असल्यास तेवढी बाब सोडून एरव्ही, कोणालाही स्वतःला गुंतवता येणार नाही किंवा त्याचे नियंत्रण करता येणार नाही. घातक औषधिद्रव्यांसंबंधीच्या देशाबाहेरील व्यवहारांवर राज्य शासनाचे नियंत्रण.

## प्रकरण ३ रे

## गुन्हे व दंड

१०. जोकोणी—— कलम ४ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

(क) कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करील किंवा कोका वनस्पतीच्या कोणत्याही भागाची वेचणी करील,

(ख) कलम ४ खाली परवानगी दिल्यानुसार नव्हे तर अन्यथा, क्रियासिद्ध अफूची निर्मिती करील किंवा ती कब्जात बाळगील, किंवा

(ग) क्रियासिद्ध अफू [२][भारतात] आयात करील, [२][भारतातून] निर्यात करील, वाहनांतरित करील किंवा विकेल,

तो [३][द्रव्यदंडासह किंवा त्याविना, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल]:

परंतु, शासनाच्या वतीने होणारी कोणतीही कोका वनस्पतीची लागवड किंवा तिच्या कोणत्याही भागाची वेचणी यांना हे कलम लागू होणार नाही.

---

१. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या नियंत्रणाच्या अधीनतेने," हे शब्द गाळले.

२. १९५६ चा अधिनियम ६२—कलम २ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

३. १९५७ चा अधिनियम ५२—कलम ६ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.

**कलम ५ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

११. जो कोणी कलम ५ किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा त्याखाली मंजूर करण्यात आलेल्या लायसनाची कोणतीही शर्त यांचे व्यतिक्रमण करून,—

(क) खसखशीची लागवड करील, किंवा

(ख) अफूची निर्मिती करील,

तो [1][ तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, द्रव्यदंडासह किंवा त्याविना, पात्र होईल ].

**कलम ६ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

१२. जो कोणी कलम ६ किंवा त्या कलमाखाली केलेला कोणताही नियम किंवा त्याखाली मंजूर करण्यात आलेल्या लायसनाची कोणतीही शर्त यांचे व्यतिक्रमण करून, कोणत्याही बनीव औषधिद्रव्याची निर्मिती करील तो [1][ तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, द्रव्यदंडासह किंवा त्याविना, पात्र होईल ].

**कलम ७ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

१३. जो कोणी कलम ७ किंवा त्या कलमाखाली केलेला कोणताही नियम किंवा त्याखाली मंजूर करण्यात आलेल्या लायसनाची कोणतीही शर्त यांचे व्यतिक्रमण करून, कोणतेही घातक औषधिद्रव्य—

(क) [3][भारतात] आयात करील,

(ख) [3][भारतातून] निर्यात करील, किंवा

(ग) वाहनांतरित करील,

तो [1][ तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, द्रव्यदंडासह किंवा त्याविना, पात्र होईल ].

**कलम ८ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

१४. जो कोणी कलम ८ किंवा त्या कलमाखाली केलेला कोणताही नियम किंवा त्याखाली दिलेल्या लायसनाची कोणतीही शर्त यांचे व्यतिक्रमण करून,—

(क) कोणतेही बनीव औषधिद्रव्य किंवा कोका पत्ती एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात आयात किंवा निर्यात करील, त्यांचे परिवहन करील, ती कब्जात बाळगील किंवा त्यांची विक्री करील, अथवा

(ख) औषधोपयोगी अफू किंवा ज्यांत मॉर्फिन, डायासिटिलमॉर्फिन किंवा कोकेन अंतर्भूत आहे असे कोणतेही सिद्धपदार्थ यांची निर्मिती करील,

तो [1][ तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, द्रव्यदंडासह किंवा त्याविना, पात्र होईल].

**गुन्हा करण्यासाठी वास्तूचा उपयोग करू देण्याबद्दल शिक्षा.**

१५. जो कोणी स्वत: एखादे घर, खोली, आवार, अवकाश, जलयान, वाहन किंवा जागा यांचा मालक किंवा ताबाधारक असून किंवा त्याचा वापर करत असून, कलम १०, कलम १२, कलम १३ किंवा कलम १४ खाली शिक्षापात्र असलेला गुन्हा करण्यासाठी अन्य कोणाही व्यक्तीला त्याचा वापर करण्यास जाणीवपूर्वक परवानगी देईल तो [1][ तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, द्रव्यदंडासह किंवा त्याविना, पात्र होईल].

**विवक्षित गुन्ह्यांबद्दल आधी झालेल्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.**

१६. कलम १०, कलम १२, कलम १३ किंवा कलम १४ खाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याबद्दल दोषसिद्धी झाली असता जो कोणी पुन्हा त्यांपैकी कोणत्याही कलमाखालील शिक्षापात्र गुन्ह्याबद्दल दोषी ठरेल तो, अशा नंतरच्या प्रत्येक गुन्ह्याबद्दल [2][द्रव्यदंडासह किंवा त्याविना] चार वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.

**कलम १५ खालील गुन्ह्याबद्दल आधी झालेल्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.**

१७. कलम १५ खाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याबद्दल दोषसिद्धी झाली असता जो कोणी पुन्हा त्या कलमाखालील शिक्षापात्र गुन्ह्याबद्दल दोषी ठरेल तो, अशा नंतरच्या प्रत्येक गुन्ह्याबद्दल [2][द्रव्यदंडासह किंवा त्याविना] चार वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.

**विवक्षित गुन्हे करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी जामीन.**

१८. (१) जेव्हा केव्हा एखादी व्यक्ती कलम १०, कलम १२, कलम १३ किंवा कलम १४ खाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरलेली असून, तिला दोषी ठरवणाऱ्या न्यायालयाच्या मते अशा व्यक्तीकडून, त्या कलमांखालील शिक्षापात्र गुन्हे करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी बंधपत्र लिहून घेणे आवश्यक असेल तेव्हा, अशा व्यक्तीला शिक्षादेश देताना न्यायालय, त्यास जास्तीत जास्त तीन वर्षेपर्यंत जितका कालावधी निश्चित करणे योग्य वाटेल तितक्या कालावधीत गुन्हे करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी तिने जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना, तिच्या ऐपतीशी प्रमाणशीर अशा एखाद्या रकमेचे बंधपत्र लिहून द्यावे असा आदेश देऊ शकेल.

---

१. १९५७ चा अधिनियम ५२-कलम ६ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.

२. कित्ता—कलम ७ द्वारे "किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस" याऐवजी घातले.

३. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

(२) हे बंधपत्र १ ल्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या नमुन्याप्रमाणे असेल आणि ते बंधपत्र म्हणजे जणू काही 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याच्या कलम १०६ खाली शांतता राखण्यासाठी जे बंधपत्र लिहून देण्याचा आदेश झाला असेल ते बंधपत्र असावे त्याप्रमाणे अशा बंधपत्राशी निगडित असलेल्या सर्व बाबींना त्या संहितेचे उपबंध जेथवर लागू करण्याजोगे असतील तेथवर लागू होतील.

(३) अपीलान्ती किंवा अन्यथा दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, असे लिहून देण्यात आलेले बंधपत्र शून्य ठरेल.

(४) या कलमाखालील आदेश अपील न्यायालयाला किंवा आपल्या पुनरीक्षणाच्या शक्ती वापरणाऱ्या उच्च न्यायालयाला काढता येईल.

१९. ज्याद्वारे एखादे घातक औषधिद्रव्य [1][भारताच्या] बाहेर मिळवले जाते, आणि [1][भारताच्या] बाहेरील एखाद्या व्यक्तीला पुरवले जाते अशा कोणत्याही व्यापारात जो कोणी कलम ९ खाली मंजूर करण्यात आलेल्या लायसनाच्या शर्तींना सोडून अन्यथा गुंतेल किंवा त्याचे नियंत्रण करील त्याला, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल. कलम ९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

२०. जो कोणी या प्रकरणाखाली शिक्षापात्र असलेला गुन्हा करण्याचा किंवा असा गुन्हा घडवून आणण्याचा प्रयत्न करील, आणि अशा प्रयत्नात गुन्हा घडण्याच्या दिशेने एखादे कृत्य करील त्याला, या गुन्ह्यासाठी उपबंधित केलेली शिक्षा देण्यात येईल. प्रयत्न.

२१. (१) जो कोणी या प्रकरणाखाली शिक्षापात्र असलेला गुन्हा करण्यास अपप्रेरणा देईल—मग अशा अपप्रेरणेच्या परिणामी तो गुन्हा घडो वा न घडो आणि 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम ११६ मध्ये काहीही अंतर्भूत असो—त्यास या गुन्ह्यासाठी उपबंधित केलेली शिक्षा होईल. अपप्रेरण.

(२) [1][भारताच्या] बाहेरील आणि पलिकडील एखाद्या ठिकाणी घडणारे जे कृत्य—

(क) [1][भारतात] घडले तर गुन्हा ठरू शकत असेल तेव्हा; किंवा

(ख) [1][भारतात] घडले तर, या प्रकरणाखाली शिक्षापात्र गुन्हा ठरण्यासाठी जे कायदेशीर घटक आवश्यक असतात तेच किंवा तत्सम सर्व कायदेशीर घटक ते कृत्य त्या ठिकाणी गुन्हा ठरावे म्हणून आवश्यक असल्याने अशा ठिकाणच्या कायद्यानुसार तो घातक औषधिद्रव्यांसंबंधीचा गुन्हा होत असेल तेव्हा,

अशा कोणत्याही कृत्याला जी व्यक्ती [1][भारतात] अपप्रेरणा देईल त्या व्यक्तीने या कलमाच्या अर्थानुसार गुन्ह्याला अपप्रेरणा दिली असे होते.

## प्रकरण ४ थे

### प्रक्रिया

२२. (१) जिल्हाधिकारी अथवा शासनाने याबाबत प्राधिकृत केलेला अन्य अधिकारी अथवा एखादा इलाखा शहर दंडाधिकारी अथवा प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा ज्यास शासनाने विशेषत: याबाबत शक्ती प्रदान केली आहे असा द्वितीय वर्ग दंडाधिकारी, ज्या व्यक्तीने ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा केला आहे असे समजण्यास त्याला कारण असेल त्या व्यक्तीच्या अटकेसाठी अथवा ज्याच्याबाबत ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा घडला आहे असे कोणतेही घातक औषधिद्रव्य जेथे ठेवण्यात किंवा लपविण्यात आले आहे असे समजण्यास त्याला कारण असेल अशा एखाद्या इमारतीची, जलयानाची अथवा जागेची दिवसा किंवा रात्री झडती घेण्यासाठी वॉरंट काढू शकेल. वॉरंटे काढण्याची शक्ती.

(२) पोटकलम (१) खालील झडती-वॉरंट ज्या अधिकाऱ्याला संबोधून पाठवले असेल त्याला कलम २३ खाली कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याच्या सर्व शक्ती असतील.

२३. (१) [2][केंद्रीय उत्पादनशुल्के, गुंगीकारक द्रव्ये, औषधिनियंत्रण, सीमाशुल्क, महसूल, पोलीस किंवा उत्पादनशुल्क या संबंधीच्या विभागातील चपराशी किंवा पोलीस शिपाई याहून अधिक वरच्या दर्जाच्या अशा ज्या कोणा कर्मचाऱ्याला केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केले असेल] त्यास त्याच्या व्यक्तिगत माहितीवरून किंवा कोणत्याही व्यक्तीने सांगितल्याबरहुकूम लेखी उतरून घेतलेल्या माहितीवरून जर, ज्याबाबत ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा घडला आहे असे एखादे घातक औषधिद्रव्य एखाद्या इमारतीत, जलयानात किंवा बंदिस्त जागेत ठेवण्यात किंवा लपवण्यात आले आहे असे समजण्यास कारण असेल तर, सूर्योदय ते सूर्यास्त यांच्या दरम्यान तो— वॉरंटाशिवाय प्रवेश करणे, झडती घेणे, सक्तीने ताब्यात घेणे आणि अटक करणे यांबाबतची शक्ती.

(क) अशा कोणत्याही इमारतीत, जलयानात किंवा जागेत प्रवेश करू शकेल;

(ख) प्रतिकार झाल्यास, दरवाजा फोडून उघडू शकेल अथवा अशा प्रवेशाला होणारा इतर कोणताही अडथळा दूर करू शकेल;

---

१. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

२. १९५७ चा अधिनियम ५२-कलम ८ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.

(शा.म.मु.) एच ४७९९—२(५३०—९-८०)

(ग्) असे औषधिद्रव्य व त्याच्या निर्मितीसाठी वापरण्यात आलेली सगळी सामग्री व कलम ३३ खाली जी सरकारजमा करण्यास पात्र आहे असे समजण्यास त्याला कारण असेल अशी इतर कोणतीही वस्तू आणि अशा औषधिद्रव्यासंबंधी ३ ऱ्या प्रकरणाखाली शिक्षापात्र गुन्हा घडल्याचा पुरावा ज्यापासून मिळू शकेल असे समजण्यास त्याला कारण आहे असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू सक्तीने ताब्यात घेऊ शकेल ; आणि

(घ्) अशा औषधिद्रव्यासंबंधी ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा ज्या व्यक्तीने केला आहे असे समजण्यास त्याला कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अडकवून तिची तो झडती घेऊ शकेल आणि स्वतःला योग्य वाटल्यास तिला अटक करू शकेल :

परंतु, झडती-वॉरंट मिळेपर्यंत थांबल्यास, पुरावा लपवण्यास नक्कीच संधी मिळेल किंवा गुन्हेगाराला पळून जाणे सोपे होईल असे समजण्यास अशा अधिकाऱ्याला कारण असेल तर, आपल्या समजामागील कारणे नमूद करून तो अशा इमारतीत, जलयानात किंवा बंदिस्त जागेत सूर्यास्त ते सूर्योदय यांच्या दरम्यान केव्हाही प्रवेश करून झडती घेऊ शकेल.

(२) जेव्हा एखादा अधिकारी पोटकलम (१) खाली कोणतीही माहिती लिहून घेईल किंवा त्याच्या परंतुकाखाली, आपल्या समजामागील कारणे नमूद करील तेव्हा, तो तत्काळ त्याची एक प्रत आपणांस पदतः निकट असलेल्या वरिष्ठाकडे पाठवील.

सार्वजनिक ठिकाणीं सक्तीने ताब्यात घेण्याची किंवा अटक करण्याची शक्ती.

२४. कलम २३ मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही विभागाचा कोणताही अधिकारी—

(क्) ज्या घातक औषधिद्रव्याच्या बाबतीत ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा घडला आहे असे समजण्यास त्यास कारण असेल ते औषधिद्रव्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा मार्गक्रमण चालू असताना व त्याच्याबरोबर, कलम ३३ खाली सरकारजमा होण्यास पात्र असेल अशी इतर कोणतीही वस्तू, आणि अशा औषधिद्रव्याच्या बाबतीत ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा घडल्याचा पुरावा ज्यामुळे मिळू शकेल असे समजण्यास त्याला कारण असेल असा एखादा दस्तऐवज किंवा अन्य वस्तू सक्तीने ताब्यात घेऊ शकेल ;

(ख्) ज्या कोणत्याही व्यक्तीने ३ ऱ्या प्रकरणाखालील शिक्षापात्र गुन्हा केला आहे असे समजण्यास त्याला कारण असेल त्या व्यक्तीला अडकवून तिची झडती घेऊ शकेल, आणि जर अशा व्यक्तीच्या कब्जात एखादे घातक औषधिद्रव्य असून तो कब्जा बेकायदेशीर आहे असे त्याला वाटले तर, त्या व्यक्तीला आणि तिच्या सोबत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तींना अटक करू शकेल.

झडत्या घेण्याची आणि अटका करण्याची पद्धत.

२५. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे उपबंध हे कलमे २२, २३ आणि २४ च्या उपबंधांशी विसंगत नाहीत तेथवर ते, त्या कलमांखाली काढण्यात आलेल्या सर्व वॉरंटांना आणि करण्यात आलेल्या अटकांना आणि घेण्यात आलेल्या झडत्यांना लागू होतील.

एकमेकांना साहाय्य करण्याचे कर्मचाऱ्यांवरील आबंधन.

२६. कलम २३ मध्ये उल्लेखिलेल्या विविध विभागांचे सर्व कर्मचारी, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या कामी तशी नोटीस देण्यात आल्यावर किंवा विनंती करण्यात आल्यावर एकमेकांना सहाय्य करण्यास विधितः बांधलेले असतील.

अटकांचा व अभिग्रहणांचा अहवाल.

२७. जेव्हा जेव्हा या अधिनियमाखाली एखादी व्यक्ती कोणासही अटक करील किंवा काहीतरी सक्तीने ताब्यात घेईल तेव्हा, अटक केल्यापासून किंवा ताब्यात घेतल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत तिला अशा अटकेच्या किंवा अभिग्रहणाच्या सगळ्या तपशिलाचा पूर्ण अहवाल तिच्या पदतः निकट असलेल्या वरिष्ठाकडे पाठवावा लागेल.

त्रास देण्यासाठी केलेला प्रवेश, झडती, अभिग्रहण किंवा अटक याबद्दल शिक्षा.

२८. कलम २३ आणि २४ खाली शक्ती प्रदान करण्यात आलेली जी कोणी व्यक्ती—

(क्) संशयास वाजवी कारणे नसताना, एखाद्या इमारतीत, जलयानात किंवा जागेत प्रवेश करील किंवा झडती घेईल अथवा प्रवेश करवील किंवा झडती घेववील ;

(ख्) कलम ३३ खाली सरकारजमा होण्यास पात्र असे कोणतेही घातक औषधिद्रव्य किंवा अन्य वस्तू सक्तीने ताब्यात घेण्याच्या किंवा त्यासाठी झडती घेण्याच्या अथवा कलम २३ खाली किंवा कलम २४ खाली सक्तीने ताब्यात घेण्यास पात्र असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू सक्तीने ताब्यात घेण्याच्या सबबीखाली एखाद्या व्यक्तीची मालमत्ता त्रास देण्याच्या हेतूने आणि विनाकारण ताब्यात घेईल ; किंवा

(ग्) कोणत्याही व्यक्तीला त्रास देण्याच्या हेतूने आणि विनाकारण अडकवून ठेवील, झडती घेईल किंवा अटक करील,

त्या व्यक्तीला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल.

अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची आणि सक्तीने ताब्यात घेतलेल्या वस्तूंची व्यवस्था.

२९. (१) कलम २२ खाली निघालेल्या वॉरंटान्वये अटक करण्यात आलेली व्यक्ती आणि सक्तीने ताब्यात घेण्यात आलेली वस्तू, ज्या प्राधिकरणाने वॉरंट काढले होते त्याच्याकडे विनाविलंब पाठवण्यात येईल; आणि कलम २३ किंवा कलम २४ खाली अटक करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती किंवा ताब्यात घेण्यात आलेली वस्तू सर्वात नजीकच्या पोलीस-ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे अथवा ज्याला कलम ३० खाली शक्ती प्रदान करण्यात आली आहे असा उत्पादनशुल्क विभागाचा जो सर्वात नजीकचा अधिकारी असेल त्याच्याकडे पाठवण्यात येईल.

(२) या कलमाखाली ज्याच्याकडे एखादी व्यक्ती किंवा वस्तू पाठवण्यात आली असेल ते प्राधिकरण किंवा तो अधिकारी अशा व्यक्तीची किंवा वस्तूची कायद्यानुसार व्यवस्था लावण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना सोयीनुसार शक्य तितक्या त्वरेने अंमलात आणील.

**पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या शक्ती उत्पादनशुल्क अधिकाऱ्याकडे विनिहित करण्याची शक्ती.**

३०. या कलमाखाली गुन्ह्यांचे अन्वेषण करण्यासाठी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला असलेल्या शक्ती राज्य शासनाला, उत्पादनशुल्क विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा अशा कोणत्याही अधिकारीवर्गाकडे विनिहित करता येतील.

३१. [**गुन्ह्यांची संपरीक्षा करण्याची अधिकारिता.**] 'अफू कायदे (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ५२)-कलम ९ द्वारे निरसित.

**विधिनिषिद्ध वस्तू कब्जात बाळगण्यावरून निघणारे गृहीतक.**

३२. या अधिनियमाखालील संपरीक्षांमध्ये, आरोपी,—

(क) कोणतेही घातक औषधिद्रव्य ;

(ख) त्याने लागवडीखाली आणलेल्या कोणत्याही जमिनीवर वाढणारी कोणतीही खसखस किंवा कोका वनस्पती ;

(ग) कोणत्याही घातक औषधिद्रव्याच्या उत्पादनासाठी मुद्दाम बनवलेला कोणताही उपकरणसंच किंवा मुद्दाम तदनुकूल बदल करून घेतलेला कोणताही भांडयांचा समूह; किंवा

(घ) ज्यावर घातक औषधिद्रव्याच्या निर्मितीच्या दिशेने काही प्रक्रिया करण्यात आलेली आहे अशी कोणतीही सामग्री किंवा ज्या सामग्रीपासून घातक औषधिद्रव्याची निर्मिती करण्यात आली तिचा राहिलेला कोणताही अवशेष,

आपल्या कब्जात कसा याबाबत समाधानकारक खुलासा देऊ शकला नाही तर, आरोपीने ३ ऱ्या प्रकरणाखाली गुन्हा केलेला आहे असे गृहीत धरता येईल.

**विधिनिषिद्ध वस्तू सरकारजमा होण्यास पात्र असणे.**

३३. (१) जेव्हा जेव्हा ३ ऱ्या प्रकरणाखाली शिक्षेस पात्र असलेला कोणताही गुन्हा घडेल तेव्हा, ज्याच्या संबंधात किंवा ज्याच्या साहाय्याने असा गुन्हा घडलेला असेल ते घातक औषधिद्रव्य, उपकरणसंच, सामग्री आणि भांडी सरकारजमा होण्यास पात्र असतील.

(२) जे पोटकलम (१) खाली सरकारजमा होण्यास पात्र आहे अशा कोणत्याही घातक औषधिद्रव्यासहित किंवा त्याच्या जोडीला कायदेशीरपणे आयात केलेले, वाहतूक केलेले, बनवलेले, कब्जात बाळगलेले किंवा विकलेले कोणतेही घातक औषधिद्रव्य आणि पोटकलम (१) खाली सरकारजमा होण्यास पात्र असे कोणतेही औषधिद्रव्य, सामग्री, उपकरणसंच, किंवा भांडी ही ज्यात सापडतील अशी पात्रे, आवेष्टने आणि आच्छादने आणि अशा पात्रांत आणि आवेष्टनांमध्ये इतर काही वस्तू असतील तर त्या आणि हे नेण्यासाठी उपयोगात आणली गेलेली जनावरे, वाहने, जलयाने आणि इतर याने ही त्याचप्रमाणे सरकारजमा होण्यास पात्र असतील :

परंतु, गुन्हा घडत आहे किंवा गुन्हा घडावयाचा होता किंवा घडणे संभवनीय आहे हे मालकाला माहीत होते हे सिद्ध झाल्याखेरीज कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा यान सरकारजमा होण्यास पात्र होणार नाही.

**सरकारजमा करण्यासंबंधीची कार्यपद्धती.**

३४. (१) या अधिनियमाखालील गुन्ह्यांच्या संपरीक्षेमध्ये —मग आरोपी दोषी ठरो वा निर्दोष ठरो— या प्रकरणाखाली सक्तीने ताब्यात घेतलेली कोणतीही वस्तू कलम ३३ खाली सरकारजमा होण्यास पात्र आहे का हे न्यायालय ठरवील आणि ती वस्तू याप्रमाणे पात्र आहे असे त्यान ठरवले तर ते त्याप्रमाणे ती वस्तू सरकारजमा करण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) या प्रकरणाखाली सक्तीने ताब्यात घेतलेली कोणतीही वस्तू कलम ३३ खाली सरकारजमा होण्यास पात्र असल्याचे दिसत असले तरी, ज्या व्यक्तीने तिच्या संबंधात गुन्हा केला ती अज्ञात असेल किंवा सापडत नसेल तर, जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेला अन्य अधिकारी त्याबाबत चौकशी करून अशी पात्रता ठरवू शकेल आणि त्याप्रमाणे ती सरकारजमा करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, कोणतीही वस्तू ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून एक महिना संपेपर्यंत किंवा जी कोणतीही व्यक्ती त्यावर कोणताही हक्क सांगेल तिचे म्हणणे आणि आपल्या दाव्याच्या संदर्भात तिने काही पुरावा सादर केला असेल तर तो ऐकून घेतल्याशिवाय ती वस्तू सरकारजमा करण्याचा आदेश दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, घातक औषधिद्रव्याखेरीज अशी कोणतीही वस्तू, जर लवकर आणि स्वभावत: नाश पावणारी असेल किंवा तिची विक्री तिच्या मालकाला फायदेशीर ठरू शकेल असे जिल्हाधिकारी किंवा तो अन्य अधिकारी यांचे मत असेल तर, तो कधीही त्या वस्तूच्या विक्रीचा निदेश देऊ शकेल; आणि या पोटकलमातील उपबंध जास्तीत जास्त व्यवहार्य असेल तितपत, विक्रीच्या निव्वळ उत्पन्नाला लागू असतील.

(३) दोषी न ठरलेली जी कोणी व्यक्ती या कलमाखाली सरकारजमा झालेल्या मालमत्तेवर कोणताही हक्क असल्याचा दावा करील ती व्यक्ती, सरकारजमा करण्याच्या आदेशाविरुद्ध सत्र न्यायालयात अपील करू शकेल.

सरकारजमा झालेल्या वस्तूंच्या विल्हेवाटीचे आणि बक्षिसांचे नियमन करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

३५. [1][जे नियम या अधिनियमाखाली राज्य शासनाला करावे लागतात त्यांच्याविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांबाबत राज्य शासन, आणि इतर गुन्ह्यांबाबत, केंद्र शासन]—

(क) या अधिनियमाखाली सरकारजमा होणाऱ्या सर्व वस्तूंची विल्हेवाट; आणि

(ख) या अधिनियमाखाली वसूल केलेले द्रव्यदंड आणि सरकारजमा केलेल्या वस्तू यांच्या उत्पन्नातून अधिकारी, खबऱ्ये व इतर व्यक्ती यांना द्यावयाची बक्षिसे,

यांबाबत विनियमन करण्यासाठी नियम करू शकेल.

## प्रकरण ५ वे

## संकीर्ण

नियमांसंबंधीचे उपबंध.

३६. (१) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील.

[2][(२) या अधिनियमाखाली करण्यात येणारे नियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येतील.]

शासनाला येणे असलेल्या रकमांची वसुली.

३७. (१) या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या एखाद्या नियमानुसार आकारता येण्याजोग्या कोणत्याही लायसन-फीची कोणतीही थकबाकी, ती भरण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीकडून किंवा (कोणी असल्यास) तिच्या जामीनदाराकडून ती जणू काही जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल.

(२) या अधिनियमाखाली केलेल्या एखाद्या नियमाला अनुसरून जेव्हा कोणतीही व्यक्ती एखादी कृती करण्यासाठी किंवा एखादी कृती करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी (कलम १८ खालील बंधपत्राव्यतिरिक्त) एखादे बंधपत्र लिहून देईल तेव्हा, अशी कृती किंवा अप्रवृत्ती ही, 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२' (१८७२ चा ९)-कलम ७४ च्या अर्थानुसार सार्वजनिक कर्तव्य असल्याचे मानण्यात येईल, आणि तिने अशा बंधपत्रातील शर्तींचा भंग केला तर, असा भंग झाल्यास जी रक्कम द्यावी लागेल असे त्यात सांगितले असेल तेवढी सर्व रक्कम, तिच्याकडून किंवा (कोणी असल्यास) तिच्या जामीनदाराकडून जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल.

'सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८' लागू करणे.

३८. घातक औषधिद्रव्यांची [3][भारतात] आयात किंवा [3][भारतातून] निर्यात आणि वाहनांतरण, यांवर ह्या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली घालण्यात आलेली सर्व प्रकारची मनाई आणि निर्बंध 'सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८' [4](१८७८ चा ८)-कलम १९ किंवा कलम १३४ अन्वये घालण्यात आलेली मनाई व निर्बंध असल्याचे मानण्यात येईल आणि तदनुसार त्या अधिनियमातील उपबंध लागू होतील:

परंतु, एखादी गोष्ट करणे हा त्या अधिनियमाखाली आणि ह्या अधिनियमाखाली शिक्षापात्र गुन्हा असेल तर, त्या अधिनियमातील किंवा या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या गुन्हेगाराला या अधिनियमाखाली शिक्षा होण्यास प्रतिबंध होणार नाही.

स्थानिक आणि विशेष कायद्यांची व्यावृत्ती.

३९. (१) जो [3][भारतात] घातक औषधिद्रव्याचे सेवन करण्यावर किंवा त्याच्या क्रयविक्रयावर या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली लादण्यात न आलेला असा एखादा निर्बंध लादतो अथवा या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली लादण्यात आलेल्या तत्सम निर्बंधापेक्षा अधिक प्रमाणात निर्बंध लादतो असा त्या त्या काळी अंमलात असलेला कोणताही [5][प्रांतीय अधिनियम [6][किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाचा अधिनियम ] ] अथवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम याच्या विधिग्राह्यतेवर या अधिनियमातील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांमधील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

(२) या अधिनियमातील किंवा त्याखाली करण्यात येणाऱ्या नियमांमधील कोणत्याही गोष्टीचा 'अफू अधिनियम, १८५७' (१८५७ चा १३) याच्या विधिग्राह्यतेवर परिणाम होणार नाही :

परंतु, जर एखादी गोष्ट करणे हा त्या अधिनियमाखाली आणि ह्या अधिनियमाखाली शिक्षापात्र गुन्हा असेल तर, त्या अधिनियमातील किंवा या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या गुन्हेगाराला या अधिनियमाखाली शिक्षा होण्यास प्रतिबंध होणार नाही.

---

१. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल" याऐवजी घातले.

२. कित्ता—द्वारे मूळ पोटकलमे (२) व (३) यांऐवजी घातले.

३. १९५६ चा अधिनियम ६२-कलम २ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

४. आता पहा, 'सीमाशुल्क अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५२).

५. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे "स्थानिक किंवा प्रांतीय विधानमंडळाची अधिनियमिती" याऐवजी घातले.

६. १९५० चा अधिनियम ३३-कलम २ व अनुसूची यांद्वारे "अथवा भाग क राज्य किंवा भाग ग राज्य विधानमंडळाचा अधिनियम" याऐवजी घातले.

४०. [**विवक्षित अधिनियमितींचे विशोधन.**] 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

४१. जर २ ऱ्या अनुसूचीच्या पहिल्या तीन स्तंभांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या अधिनियमितीखाली केलेली एखादी गोष्ट या अधिनियमाच्या प्रारंभकालाच्या लगतपूर्वी अंमलात असेल तर, ती गोष्ट या अधिनियमाच्या प्रारंभी व तेव्हापासून या अधिनियमाखाली किंवा, प्रकरणपरत्वे, त्याद्वारे विशोधित केलेल्या अशा अधिनियमितीखाली केली असल्याचे मानण्यात येईल. **आधीच केलेल्या गोष्टींची व्यावृत्ती.**

## अनुसूची १ ली

'घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०' खाली गुन्हे करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी बंधपत्र.

(कलम १८ पहा)

मी, (नाव) ······················, राहणार ··············, यास 'घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०' चे कलम १०, कलम १२, कलम १३ आणि कलम १४ यांखाली——या मुदतीपर्यंत गुन्हा करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी बंधपत्र लिहून देण्यास फर्मावण्यात आले आहे, म्हणून उक्त मुदतीत असा कोणताही गुन्हा न करण्यास मी याद्वारे स्वतःला बांधून घेत आहे आणि यात माझ्याकडून काही कसूर झाल्यास, रुपये ······ इतकी रक्कम मला गमवावी लागेल व ती [1][सरकारकडे] [2]* * * जमा होईल असे बंधन मी याद्वारे स्वतःवर लादून घेत आहे.

दिनांक····················· माहे············· १९···· रोजी.

(सही) ·············

(जामीनदारांसह बंधपत्र लिहून द्यावयाचे असेल त्यावेळी आणखी पुढील मजकूर घालावा——)

उपरोक्त (नाव) ························· उक्त मुदतीत 'घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०' चे कलम १०, कलम १२, कलम १३ आणि कलम १४ यांखाली गुन्हा करण्यापासून अप्रवृत्त राहील यासाठी आम्ही याद्वारे स्वतःला जामीनदार म्हणून जाहीर करत आहोत; आणि यात त्याच्याकडून काही कसूर झाल्यास, रुपये ········ इतकी रक्कम आम्हाला गमवावी लागेल व ती [1][सरकारकडे] [2]* * * * जमा होईल असे बंधन आम्ही संयुक्तपणे आणि अलग अलगपणे स्वतःवर लादून घेत आहोत.

दिनांक········· माहे·········· १९ रोजी.

(सह्या)

**अनुसूची २ री.**——[स्थानिक अधिनियमांचे विशोधन.] 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)-कलम २ आणि अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'हिज मॅजेस्टी द किंग' याऐवजी हा उल्लेख घातला.
२. 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे 'एंपरर ऑफ इंडिया' याचा उल्लेख गाळला.

## THE DANGEROUS DRUGS ACT, 1930

## घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| along with or in addition to | –सहित किंवा त्याच्या जोडीला | [S. 33(2)] |
| Articles | कलमबंदी | [Preamble] |
| Bhang | भांग | [S. 2(c)(i)] |
| British Pharmacopoeia | ब्रिटिश औषधिगुणधर्मग्रंथ | [S. 2(f)(i)] |
| capsules of the poppy | खसखशीची बोंडे | [S. 2(e)(i)] |
| coca leaf | कोका पत्ती | [S. 2(a)] |
| Contracting Parties | संविदाकार पक्ष | [Preamble] |
| Convention | अभिसंधि | [Preamble] |
| crushed | चेचलेली | [S. 2(e)(i)] |
| cut | फुटलेली | [S. 2(e)(i)] |
| dangerous drug | घातक औषधिद्रव्य | [S. 2(h)] |
| derivative | --- जन्य पदार्थ | [S. 2(b)] |
| dross | गाळ | [S. 2(f)(ii)] |
| drug | औषधिद्रव्य | [Short title] |
| extract | अर्क | [S. 2(f)(ii)] |
| flowering or fruiting tops | फुलारणारे किंवा फळणारे शेंडे | [S. 2(c)(i)] |
| gather | वेचणे | [S. 4(1)(a)] |
| granulated | कणीदार | [S. 2(f)(i)] |
| hemp | हेंप | [S. 2(c)] |
| immediate official superior | पदतः निकट असलेला वरिष्ठ | [S. 23(2)] |
| Indian hemp | इंडियन हेंप | [S. 2(c)(ii)] |
| manufacture any manufactured drug | कोणत्याही बनीव औषधिद्रव्याची निर्मिती करणे | [S. 6(1)] |
| manufactured drug | बनीव औषधिद्रव्य | [S. 2(g)] |
| manufacturing chemist | निर्मिती करणारा औषधकार | [S. 5(3)] |
| means | ऐपत | [S. 18(1)] |
| medicinal hemp | औषधोपयोगी हेंप | [S. 2(d)] |
| medicinal opium | औषधोपयोगी अफू | [S. 2(f)(i)] |
| medicinal use | औषधी उपयोग | [S. 2(f)(i)] |
| neutral materials | उदासीन द्रव्ये | [S. 2(f)(i)] |
| officer | कर्मचारी | [S. 23(1)] |
| officinal and non-officinal | शास्त्रीय आणि शास्त्रीयेतर | [S.2(b)(iv)] |
| opium | अफू | [S. 2(e)] |
| powdered | पूड केलेली | [S. 2(e)(i)] |
| prepared opium | क्रियासिद्ध अफू | [S. 2(f)(ii)] |
| spontaneously coagulated juice | नैसर्गिकपणे साकळलेला रस | [S. 2(e)(ii)] |
| stalks | डेंखे | [S.2(c)(i)] |
| series of operations | प्रक्रियाक्रम | [S. 2(f)(ii)] |
| tranship | वाहनांतरण करणे | [S. 4(i)(c)] |
| vexatiously and unnecessarily | त्रास देण्याच्या हेतूने आणि विनाकारण | [S. 28(b)] |

# घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०

# THE DANGEROUS DRUGS ACT, 1930

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अफू | opium | [S. 2(e)] |
| अभिसंधि | Convention | [Preamble] |
| अर्क | extract | [S. 2(f)(ii)] |
| इंडियन हेंप | Indian hemp | [S. 2(c)(ii)] |
| उदासीन द्रव्ये | neutral materials | [S. 2(f)(i)] |
| ऐपत | means | [S. 18(1)] |
| औषधिद्रव्य | drug | [Short title] |
| औषधी उपयोग | medicinal use | [S. 2(f)(i)] |
| औषधोपयोगी अफू | medicinal opium | [S. 2(f)(i)] |
| औषधोपयोगी हेंप | medicinal hemp | [S. 2(d)] |
| कणीदार | granulated | [S. 2(f)(ii)] |
| कर्मचारी | officer | [S. 23(1)] |
| कलमबंदी | Articles | [Preamble] |
| कोका पत्ती | coca leaf | [S. 2(a)] |
| कोणत्याही बनीव औषधिद्रव्याची निर्मिती करणे | manufacture any manufactured drug | [S. 6(1)] |
| क्रियासिद्ध अफू | prepared opium | [S. 2(f)(ii)] |
| खसखशीची बोंडे | capsules of the poppy | [S. 2(e)(i)] |
| गाळ | dross | [S. 2(f)(ii)] |
| घातक औषधिद्रव्य | dangerous drug | [S. 2(h)] |
| चेचलेली | crushed | [S. 2(e)(i)] |
| —जन्य पदार्थ | derivative | [S. 2(b)] |
| डेंखे | stalks | [S. 2(c)(i)] |
| त्रास देण्याच्या हेतूने आणि विनाकारण | vexatiously and unnecessarily | [S. 28(b)] |
| निर्मिती करणारा औषधकार | manufacturing chemist | [S. 5(3)] |
| नैसर्गिकपणे साकळलेला रस | spontaneously coagulated juice | [S. 2(e)(ii)] |
| पदतः निकट असलेला वरिष्ठ | immediate official superior | [S. 23(2)] |
| पूड केलेली | powdered | [S. 2(e)(i)] |
| प्रक्रियाक्रम | series of operations | [S. 2(f)(ii)] |
| फुटलेली | cut | [S. 2(e)(i)] |
| फुलारणारे किंवा फळणारे शेंडे | flowering or fruiting tops | [S. 2(c)(i)] |
| बनीव औषधिद्रव्य | manufactured drug | [S. 2(g)] |
| ब्रिटिश औषधिगुणधर्मग्रंथ | British Pharmacopoeia | [S. 2(f)(i)] |
| भांग | Bhang | [S.2(c)(i)] |
| वाहनांतरण करणे | tranship | [S. 4(1)(c)] |
| वेचणे | gather | [S. 4(1)(a)] |
| शास्त्रीय आणि शास्त्रीयेतर | officinal and non-officinal | [S. 2(b)(iv)] |
| संविदाकार पक्ष | Contracting Parties | [Preamble] |
| —सहित किंवा त्याच्या जोडीला | along with or in addition to | [S. 33(2)] |
| हेंप | hemp | [S. 2(c)(ii)] |